# को.ए.सो. जानकीबाई रघुनाथ हळदवणेकर कन्याशाळा व उच्च माध्यमिक शाळा, अलिबाग

अहवाल वर्षी मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेचा शाळेचा निकाल ९२.६७% लागला. कु. गोरेगावकर जुई प्रदीप ९४.८०%, कु. वारंगे श्रावणी प्रशांत ९२.८०%, कु.कदम मोक्षदा धोंडीराम ९०.८०% यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत वाणिज्य विभागाचा निकाल ९६.७३% लागला. कु.पाटील सुप्रिया दगडू ७८.७७%, कु. टोलकर जुईली नरेश ७७.३८%, कु.खातू मानसी नरेश ७६.३१% यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. व्यवसायिक अभ्यासक्रम शाखेचा निकाल ९५.८३% लागला. कु.भगत रूचिता जगन्नाथ (मार्केटींग) ७५.५४%, कु.ढाले लीना उद्धव (बँकिंग) ७३.२३%, कु.जाधव सुवर्णा रमेश (पर्चेसीग) ७२.३१% यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविला.

गणित संबोध परीक्षेत ५ वी व ८ वी चा निकाल १००% लागला. कु.आदिती मनोहर म्हात्रे इ. ८ वी ही गुणवत्ता यादीत आली. तिला सुवर्णपदक, प्रशस्तीपत्रक व पुस्तक देऊन गौरविण्यात आले. ज्युनिअर न्यूटन टॅलेंट सर्च परीक्षेस ५ वी ते ९ वी च्या २० विद्यार्थिनी बसल्या व १००% निकाल लागला. एन.टी.एस. परीक्षेला १६ विद्यार्थिनी व एन.एम.एम.एस. परीक्षेस १० विद्यार्थिनी बसल्या.

होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेसाठी इ.६ वी च्या १७ विद्यार्थिनी व इ. ९ वी च्या २३ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र मिळाले. कु. मधुली सुबोध पडवल इ.६ वी या विद्यार्थिनीची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात (९ वी ते १२ वी गट) कु.गायत्री प्रवीण जोशी व वैभवी अभय देवधरकर (इ. ९ वी) यांच्या प्रतिकृतीस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. कु.गायत्री प्रवीण जोशी हिचा वाक्स्पर्धेत प्रथम क्रमांक आला. इ.५ वी ते ८ वी गटात कु.आदिती लालबाबू श्रीवास्तव हिचा निबंधस्पर्धेत द्वितीय क्रमांक आला.

शासकीय चित्रकला (एलिमेंटरी) परीक्षेत सर्व २९ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. कु.वाले मृणाल श्याम ही अ श्रेणीत उत्तीर्ण झाली. इंटरमिजिएट परीक्षेला १८ विद्यार्थिनी बसल्या व सर्व उत्तीर्ण झाल्या. कु.देवधरकर वैभवी अभय व कु. पाटील पूजा ज्ञानेश्वर यांना अ श्रेणी मिळाली. महाराष्ट्र राज्य बालचित्रकला स्पर्धेत ६० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. विपर्णा ईलमकर मॅडम यांना निबंधलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला.

रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे शाळेला स्वच्छ शाळा-सुंदर शाळा हा पुरस्कार (द्वितीय क्रमांक) मिळाला.

यावर्षी कन्याशाळेचे चेअरमन मा.श्री.सुरेश पाटील साहेबांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. गोविंदाश्रम सामाजिक संस्था, सासवणे यांच्याकडून कन्याशाळेला भेट म्हणून प्रोजेक्टर देण्यात आला. गरीब व होतकरू विद्यार्थिनींना शालेयपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. गोविंदाश्रमाचे अध्यक्ष श्री.के.एम.म्हात्रे सर व अन्य सदस्य यावेळी उपस्थित होते.

कन्याशाळेचे चेअरमन मा.सुरेश पाटील साहेब, को.ए.सो.चे अध्यक्ष, कार्यवाह, सर्व संचालक, कार्यकारी अधिकारी या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचा उत्तरोत्तर विकास सुरूच आहे.



कु. गोरेगांवकर जुई प्रदिप
एस. एस.सी. (९४.८०%)



कु. पाटील सुप्रिया दगडू
एच. एस.सी.- कॉमर्स (७८.७७%)



कु. भगत रूचिता जगन्नाथ
एच.एस.सी.-व्होकेशनल(७५.५४%)



कु. जोशी गायत्री प्रवीण
तालूकास्तरीय वाक्स्पर्धा-व्दितीय



कु. श्रीवास्तव आदिती लालबाबू
तालूकास्तरीय निबंधस्पर्धा-व्दितीय



कु. देवघरकर वैभवी अभय
(तालूकास्तरीय विज्ञान प्रदर्शन)



रायगड जिल्हा मुख्याधापक संघातर्फे स्वच्छ - सुंदर शाळा हा पुरस्कार स्वीकारताना शाळेच्या विद्यार्थी (व्दितीय क्रमांक)



श्रीम. ईलमकर विपर्णा वामन
(तालूकास्तरीय निबंध स्पर्धेत तृतीय)



गोविंदाश्रम सामाजिक संस्था सासवणेचे अध्यक्ष श्री. के.एम. म्हात्रे, कन्याशाळेला प्रोजेक्टर देताना चेअरमन मा. सुरेश पाटील साहेब, मुख्याध्यापिका श्रीम. वालेकर मॅडम पर्यवेक्षक श्री. पाटीलसर व गोविंदाश्रमचे अन्य सदस्य